**निवड समिती नांदेड**

**कोतवाल पदासाठी भरती 2015**

जा.क्र.2015/मशाका 1/आस्था 2/टे-1/प्र.क्र 03 दि.        /03/2015

शासन निर्णय पिकेए 1059 व्हीआयएल, बाम्बे सरकार, सचिवालय बाम्बे दि.07 मे 1959, महाराष्ट्र शासन महसूलव वन विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक केओटी 2008/प्रक225/ इ 10/दि.20 मे 2010, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक केओटी 2008 प्रक्र 225/इ 10 दि.02 एप्रिल 2012, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक केओटी 2012/प्रक्र 432/इ 10 दि.05 सप्टेबर 2013, शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र.केओटी/1073/3043-ल दि.28.02.1974 तसेच मा.विभागीय आयुक्त यांचे पत्र क्र 2014/मशाका2/तलाठी-कोतवाल/प्रक्र/कावि दि.23.12.2014 अन्वये शासन धोरणानुसार तहसिल कार्यालयाच्या आस्थापनेवरील कोतवालाची पद भरतीमध्ये एकसुत्रीपणा येण्याचे दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयाचे स्तरावरुन परीक्षा घेवुन निवड करण्याची आहे.

कोतवाल या मानधन तत्वावरील पदासाठी खालील नमुद केलेल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडुन या जाहीरातीद्वारे विहित नमुन्यातील Online अर्ज मागविण्यात येत आहेत. परीक्षेचा दिंनाक व अंतिम अर्ज स्विकारण्याचा दिंनाक खालील प्रमाणे आहे. अर्जदाराने online अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी तसेच online अर्जासोबत कोणेतही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे् जोडून (upload) करु नयेत. online भरलेल्या माहितीच्या आधारेच निवड करण्यात येईल तसेच निवडीनंतर माहिती चूक आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व पुढील गुणानूक्रमे असलेल्या उमेदवारास संधी देण्यात येईल. तसेच online अर्ज करताना आपल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींची पुर्ण माहिती नमूद करावी. भरलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्रे / अभिलेखे नंतर सादर केल्यास विचारात घेतले जाणार नाहीत.

| **अ. क्रं** | **पदाचे नांव** | **परीक्षेचा दिंनाक** | **Online पध्दतीने अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिंनाक** | **स्टेट बॅक ऑफ इंडीयातर्फे शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिंनाक** | **परीक्षेच प्रवेश पत्र संकेतस्थळावर निर्गमित करण्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कोतवाल | 19.04.2015 | 05.04.2015 (रात्री 11.00 वाजेपर्यंत) | 07.04.2015 (बॅंके वेळेपर्यंत) | 11.04.2015 |

### कोतवालांचे तालुकानिहाय रिक्त पदांचे व आरक्षणाचा तपशील खालील प्रमाणे आहे.
### परीक्षा दिंनाक 19.04.2015

| अ.क्र. | तहसिल कार्यालय | तपशिल माहिती | आरक्षीत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज. | विजा अ | भज ब | भजक | भजड | विमाप्र | इ.मा.व. | खुला | एकुण |
| 1 | नांदेड | रिक्त पदे | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 3 | 18 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 2 | 14 |
| | | महीला पदे | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 04 |
| 2 | अर्धापुर | रिक्त पदे | 0 | 1 | 01 (विजा अ) | | | | | 3 | 4 | 09 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 0 | 1 | 01 (विजा अ) | | | | | 2 | 3 | 07 |
| | | महीला पदे | 0 | 0 | 0 | | | | | 1 | 1 | 02 |
| 3 | मुदखेड | रिक्त पदे | 1 | 1 | 01 (विजा अ) | | | | 0 | 2 | 6 | 11 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 1 | 1 | 01 (विजा अ) | | | | 0 | 1 | 4 | 08 |
| | | महीला पदे | 0 | 0 | 0 | | | | 0 | 1 | 2 | 03 |
| 4 | कंधार | रिक्त पदे | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 | 5 | 22 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 | 4 | 17 |
| | | महीला पदे | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 05 |
| 5 | भोकर | रिक्त पदे | 3 | 1 | 03 (विजा अ/भज ब, क) | | | | 0 | 5 | 8 | 20 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 2 | 1 | 02 (विजा अ/भज ब, क) | | | | 0 | 4 | 6 | 15 |
| | | महीला पदे | 1 | 0 | 01 (विजा अ/भज ब, क) | | | | 0 | 1 | 2 | 05 |
| 6 | उमरी | रिक्त पदे | 2 | 1 | 02 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 3 | 7 | 15 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 1 | 1 | 01 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 2 | 5 | 10 |
| | | महीला पदे | 1 | 0 | 01 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 1 | 2 | 05 |
| 7 | हदगाव | रिक्त पदे | 6 | 3 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 8 | 8 | 31 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 6 | 23 |
| | | महीला पदे | 2 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 2 | 08 |

| अ.क्र. | तहसिल कार्यालय | तपशिल माहिती | आरक्षीत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज. | विजा अ | भज ब | भजक | भजड | विमाप्र | इ.मा.व. | खुला | एकुण |
| 8 | किनवट (पेसा अंतर्गत क्षेत्र ) | रिक्त पदे | 0 | 33 | 01 (विजा अ/भज ब,क,ड/विमाप्र) | | | | | 2 | 3 | 39 |
| | | पेसानुसार भरावयाची | 0 | 33 | 0 | | | | | 0 | 0 | 33 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 0 | 23 | 01 (विजा अ/भज ब,क,ड/विमाप्र) | | | | | 1 | 2 | 27 |
| | | महीला पदे | 0 | 10 | 0 | | | | | 1 | 1 | 12 |
| 9 | माहुर (पेसा अंतर्गत क्षेत्र ) | रिक्त पदे | 1 | 15 | 00 | | | | | 1 | 2 | 19 |
| | | पेसानुसार भरावयाची | 0 | 15 | 00 | | | | | 0 | 0 | 15 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 1 | 11 | 00 | | | | | 1 | 1 | 14 |
| | | महीला पदे | 0 | 4 | 00 | | | | | 0 | 1 | 05 |
| 10 | हिमायत - नगर | रिक्त पदे | 2 | 1 | 02 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 3 | 6 | 14 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 1 | 1 | 01 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 2 | 4 | 09 |
| | | महीला पदे | 1 | 0 | 01 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 1 | 2 | 05 |
| 11 | देगलुर | रिक्त पदे | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 | 7 | 25 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 | 5 | 19 |
| | | महीला पदे | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 | 06 |
| 12 | मुखेड | रिक्त पदे | 6 | 1 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 0 | 8 | 21 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 4 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 6 | 16 |
| | | महीला पदे | 2 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 05 |
| 13 | बिलोली | रिक्त पदे | 4 | 1 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 6 | 9 | 23 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 3 | 1 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 4 | 6 | 17 |
| | | महीला पदे | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 3 | 06 |
| 14 | नायगाव | रिक्त पदे | 3 | 2 | 03 (विजा अ/भज ब,क) | | | | 1 | 5 | 10 | 24 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 2 | 1 | 02 (विजा अ/भज ब,क) | | | | 1 | 4 | 7 | 17 |
| | | महीला पदे | 1 | 1 | 01 (विजा अ/भज ब,क,) | | | | 0 | 1 | 3 | 07 |

| अ.क्र. | तहसिल कार्यालय | तपशिल माहिती | आरक्षीत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज. | विजा अ | भज ब | भजक | भजड | विमाप्र | इ.मा.व. | खुला | एकुण |
| 15 | धर्माबाद | रिक्त पदे | 1 | 1 | 02 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 3 | 6 | 13 |
| | | भरावयाची सर्वसाधारण पदे | 1 | 1 | 01 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 2 | 4 | 09 |
| | | महीला पदे | 0 | 0 | 01 (विजा अ/भज ब) | | | | 0 | 1 | 2 | 04 |
| | एकुण | | | | | | | | | | | |

**नोट :- विजा अ/भज ब,क,ड/विमाप्र या प्रवर्गातील सामाईक रिक्त पदे कंसात नमुद केलेल्या जात प्रवर्गासाठी राखीव आहेत.**

### 1. अटी व शर्ती :-

| | |
|---|---|
| 1.शैक्षणीक पात्रता | अर्जदार शासन मान्य शाळेची इयत्ता 4 थी उतीर्ण असावा . |
| 2.वयोमर्यादा | जाहीरातीत नमुद केलेल्या कोतवाल या पदाकरीता दिनांक 05.04.2015 रोजी किमान 18 वर्षे पुर्ण तर कमाल वयोमर्यादा 40 वर्षे असावी. |
| 3.रहिवाशी | 1. अर्जदाराने ज्या तालुक्यातील पदासाठी अर्ज केला आहे. त्या तालुक्याचा रहावासी असावा. तहसीलदार यांचेकडुन निर्गमीत केलेले रहिवासी प्रमाणपत्र असावे.<br>2.किनवट तालुक्यातील व माहुर तालुक्यातील अनुसुचित जमाती प्रवर्गातील पदे पेसा कायद्या अंतर्गत अनुसुचित स्थानिक क्षेत्राचे रहिवाशी असणा-या अनुसचित जमातीच्या उमेदवारामधुन भरण्यात येतील |

### 2) इतर अटी व शर्ती :-

**अर्जदारास सर्वसाधारण महत्वाच्या सूचना व अटी**

1. कोतवाल या पदासाठी 75 गुंणांची लेखी परीक्षा व 25 गुणांची तोंडी परीक्षा घेवुन 100 गुणांचे आधारे गुणानुक्रम पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. सदर पदासाठी वस्तुनिष्ठ पध्दतीची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
2. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षणात बदल करणे, परीक्षा स्थगीत करणे व रद्द

करणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवले आहेत. याबाबत कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

3. भरती प्रक्रीये दरम्यान काही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास मा.न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. लेखी परीक्षा/मौखीक परीक्षा/निवड याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.
4. लेखी परीक्षेत किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
5. लेखी व तोंडी परीक्षेत प्राप्त गुणवत्तेनुसार निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचे कागदपत्रे पडताळणी नंतर अंतीम निवड करण्यात येईल.
6. उमेदवारांना परीक्षेस येण्याजाण्याचा प्रवास खर्च दीला जाणार नाही.
7. जाहीरातीत नमुद केलेली प्रवर्गाची / संवर्गाची पदे कोणत्याही कारणास्तव कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्ती बाबत हक्क प्रस्थापीत करता येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासनाचे सोयीनुसार जिल्ह्यात कुठेही पदस्थापना देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत /स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.
8. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहीवासी असावा.(अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक )
9. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
10. उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्या जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

## 3. शुल्क (फी) :-

- **अर्जदारास परीक्षा शुल्क भरण्याचे दोन पर्याय उपलब्ध असतील.**
  - i) **पध्दत-1 (Payment by Bank Challan)**
  - ii) **पध्दत-2 (E-Payment / Online Payment)**

| अ.क्र | पदाचे नांव | परिक्षा शुल्क | | अधिक रक्कम - Commission / Processing Charges | |
|---|---|---|---|---|---|
| | | खुल्या प्रवर्गातील उमेदवार | मागास प्रवर्गातील उमेदवार | पद्धत - 1 बँकेच्या चलनाद्वारे रक्कम भरणे | पद्धत - 2 e-Payment (Online Payment) |
| 1 | कोतवाल | **200/-** | **100/-** | **40/-** | **20/-** |

## 4) Online अर्ज करणे प्रक्रीयेची थोडक्यात पद्धती. (विस्तृत माहितीसाठी संकेतस्थळावरील "अर्ज कसा भरावा" पहावे.)

अर्जदाराने online अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी तसेच online अर्जासोबत कोणेतही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे **जोडू (upload) करु नयेत**. online भरलेल्या माहितीच्या आधारेच निवड करण्यात येईल

तसेच निवडीनंतर माहिती चूक आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व पुढील गुणानूक्रमे असलेल्या उमेदवारास संधी देण्यात येईल. तसेच online अर्ज करताना आपल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींची पुर्ण माहिती नमूद करावी. भरलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्रे / अभिलेखे नंतर सादर केल्यास विचारात घेतले जाणार नाहीत.

**<u>अर्ज कसा भरावा -</u>**

**a)** प्रत्यक्ष अर्ज भरण्यापूर्वी या पदाबाबतीची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून पहाव्यात.सदर विस्तृत जाहिरात **http://nanded.applygov.com, www.nanded.nic.in** वर उपलब्ध आहे.

**b)** **http://nanded.applygov.com** या संकेतस्थळावर अर्ज करा Apply now या Link वर Click करावे व पुढील माहिती भरावी.

**c)** अर्ज करण्यासाठी आपल्याकडे Soft Copy स्वरुपात खालील बाबी सोबत असाव्यात.

| तपशील | Size Limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलिकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (Recent Photo graph) | JPEG FORMAT मधील 15-75 KB | • लांबी/रुंदी प्रमाण (Proportion) 3:4 असावे.<br>• छायाचित्र समोर चेहरा असलेले असावे.<br>• छायाचित्राचा 75% भाग चेहरा असावा.<br>• छायाचित्र नजीकचे व स्पष्ट असावे. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील 10-50 KB | • कोऱ्या कागदावर गडद/जाड पाँईटच्या पेनने केलेली असावी.<br>• स्वाक्षरी स्पष्ट असावी व लांबी/रुंदी प्रमाण 2:1 असावे.<br>• रुलींग पेपर अथवा स्वाक्षरी व्यतिरीक्त इतर बाबी असलेल्या कागदाचा उपयोग करु नये. |

**d)** उमेदवाराची Photo व सही व्यतिरिक्त कोणत्याही प्रमाणपत्र / अभिलेख्यांची Soft Copy अर्ज भरताना सोबत जोडावयाची (upload करण्याची) आवश्यकता नाही.

**e)** अर्जदाराने Upload केलेली Image सुस्पष्ट नसल्यास तो अपात्र ठरविला जाऊ शकतो.

**f)** सदर पेजवरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर Continue यावर click करावे.

**g)** अर्जात भरलेली माहिती परिपूर्ण असल्यास येणाऱ्या मेसेज बॉक्समध्ये भरतीप्रक्रीयतील पुढील बाबींसाठी (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेशपत्र काढणे इ. ) जन्मतारीख आवश्यक असल्याने ती बरोबर असल्याची खात्री करा अथवा "Edit Form" यावर click करुन फॉर्ममध्ये बदल करा" असा संदेश दिसेल.

**h)** अर्जातील माहिती बरोबर असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती बरोबर केल्यानंतर "Save & continue" यावर click करावे. त्यानंतर अर्जाचा ID, ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची अथवा विहित केलेल्या बँकेत परीक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल. तसेच अर्जात नमुद भ्रमणध्वनी क्रमांकावर व ई-मेल वर सदर माहिती पाठविण्यात येईल.

**i)** तयार झालेला Form ID भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने, तो उमेदवारांनी सांभाळून/ नोंद करुन ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवारास बदलता येणार नाही.

**j)** **त्यानंतर अर्जदारास परीक्षा शुल्क भरण्याचे दोन पर्याय उपलब्ध असतील.**

i) **पध्दत-1 (Payment by Bank Challan)**

ii) **पध्दत-2 (E-Payment / Online Payment)**

**k)** **पध्दत-1 (Payment by Bank Challan)** - अर्जदाराने "Print Challan" यावर Click करुन चलानची प्रिंट घ्यावी. चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फत उमेदवाराने चलनात नमुद असलेले आवश्यकतेनुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया च्या कोणत्याही शाखेमध्ये, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत भरता येईल. चलनाच्या 2 प्रतींपैकी, एक प्रत बँकेकडून अर्जदारास दिली जाईल.

- कृपया लक्षात घ्यावे. - आपला Form यशस्वीरित्या Save झाल्यानंतर आपली माहिती (Data) कार्यालय ते State Bank of India चे Sever शी Synchronization (माहितीची देवाणघेवाण) होण्यासाठी 48 तासाचा कालावधी लागतो. त्यामुळे आपण Form भरल्यानंतर 48 तासानंतरच Bank मध्ये जावे. अन्यथा जर आपण 48 तासांच्या आतच Bank मध्ये गेल्यास आपली माहिती Bank मध्ये पोहोचली नसल्यामुळे Bank Cashier आपले चालान भरुन घेणार नाही.
- Online अर्ज केल्यानंतर संकेतस्थळावर निघणारेच Challan बँकेत रक्कम भरण्यासाठी वापरावे. या Challan मध्ये उमेदवाराचा Form ID बँकेच्या Cashier ने टाकताच त्या उमेदवाराची माहिती त्यांच्या संगणकावर त्यांना दिसेल व त्याप्रमाणे ते चालान शुल्क भरुन घेतील. त्यामुळे बँकेत आपण इतर चालान दिल्यास, बँकेमार्फत ते स्विकारल्या जाणार नाही.
- उमेदवाराची निवड झाल्यास सदर Challan उमेदवाराने सादर करावयाचे असल्यामुळे उमेदवारांनी सदर Challan ची प्रत सांभाळून ठेवावी.

**l)** **पध्दत-2 (E-Payment / Online Payment)** - अर्जदाराने "Pay online" यावर click करावे. त्यानंतरच्या पेजवर "Go to payment page" यावर click करावे. त्यानंतर परीक्षा शुल्क भरण्यासाठीची आवश्यक माहिती जसे Net Banking Details / डेबीट/क्रेडीट कार्ड क्रमांक, नांव, वैधता दिनांक, कार्डचा प्रकार, बँकेचे नांव, खाते क्रमांक, पासवर्ड इत्यादी ई-पेमेंट प्रकाराच्या आवश्यकतेनुसार भरावे व ई-पेमेंट करावे. त्यानंतर तयार होणाऱ्या पावतीची प्रिंट स्वत:कडे ठेवावी. (Online Payment कसे भरावे याकरीता Home Page वरील शंका समाधान यावर Click करावे.)

**m)** ऑनलाईन पध्दतीने प्राप्त अर्ज व भरलेले परीक्षा शुल्क यांची छाननी करुन अर्जाची पात्र-अपात्रता ठरविण्यात येईल. अर्जाची पात्र-अपात्रता चलनाची माहिती भरल्यानंतर अथवा ई-पेमेंट केल्यानंतर 48 तासाने पाहता येईल. उमेदवाराने पद्धत 1 / 2 नूसार सदर रक्कम भरल्यानंतर 48 तासात उमेदवारास ही प्रक्रीया यशस्वीरित्या पुर्ण झाल्याचा e-mail व SMS द्वारे संदेश देण्यात येईल. पद्धत 1 / 2 नूसार रक्कम भरल्यानंतर 48 तासांच्या पूर्वीच अर्जदाराने त्याची पात्रता संकेतस्थळावर तपासल्यास “आपल्या परीक्षा शूल्काची वैधता तपासणी प्रलंबीत आहे. कृपया 24 तासानंतर तपासा. ” अशी सूचना दिसेल.

**n)** **http://nanded.applygov.com** संकेतस्थळावरील **"अर्जाची पात्रता"** या सदरावर click करावे. त्यानंतरच्या पेजवर पदाच्या नावाची निवड करुन Form ID व जन्मदिनांक याबाबतची माहिती भरावी. ती माहिती भरल्यानंतर "Open Form" यावर click केल्यानंतर केलेल्या अर्जाची पात्र-अपात्रता पाहता येईल.

**o)** अर्ज प्रक्रीया यशस्वीरित्या पुर्ण झाल्याचा e-mail किंवा SMS प्राप्त झाल्यानंतर उमेदवार Form ची पोचपावती Print काढून घेऊ शकतो. सदरील Form पोचपावती Print काढण्याची बाब ऐच्छीक असून उमेदवाराला रक्कम भरण्याची प्रक्रीया यशस्वीरित्या पुर्ण झाल्याचा प्राप्त e-mail किंवा SMS पोचपावती म्हणून ग्राह्य धरली जाऊ शकते.

**p)** पोचपावती काढण्याकरीता चअर्जाची पोचपावती" यावर click करावे. त्यानंतरच्या page वर पदाची निवड करुन form ID व Date of Birth ही माहिती भरुन "Print Receipt" यावर click करावे. त्यानंतर उमेदवारांच्या अर्जाची पोचपावती उपलब्ध होईल.

**q)** अपात्र ठरलेल्या अर्जांचे बाबतीत आक्षेप असल्यास मदतीच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी **सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 पर्यंत** संपर्क साधावा अथवा **support@applygov.com** या ई-मेल संपर्कावर आपले म्हणणे कळवावे.

**r)** उमेदवाराने अर्ज करताना त्यांचा अचुक भ्रमणध्वनी कमांक (Mobile No.) व e-mail ID हे रकाने भरणे अनिवार्य नसले, तरी त्यांनी अशी माहिती दिल्यास, त्यांना SMS व e-mail द्वारे त्यांच्या अर्जासंबधीची वेळोवेळी विविध माहिती कळविणे शक्य होईल. परंतु उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण, तसेच मोबाईल क्रमांक, NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवाराना प्राप्त न झाल्यास, त्यांची संपुर्ण जबाबदारी संबधित उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना कार्यालय जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन, भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

**s)** अर्ज भरतेवेळी e-payment पध्दतीने परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांना e-payment च्या पावतीची प्रत, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी कार्यालयाकडे जमा करावी लागेल. सदर चलनाची मुळ प्रत/e-payment ची पावती असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छानननी केली जाणार नाहीत व त्यास अपात्र ठरविण्यात येईल. परीक्षा शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**t)** छानननी अंती पात्र उमेदवारांचे प्रवेशपत्र http://nanded.applygov.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी स्थळ, वेळ प्रवेशपत्रावर देण्यात येईल. उमेदवाराचे प्रवेशपत्र त्यांनी online पद्धतीने उपरोक्त दिलेल्या तारखेनंतर Download करुन घ्यावयाचे आहेत. **या कार्यालयाकडून प्रवेशपत्र निर्गमित केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.** उमेदवारांना सदर प्रवेशपत्र हस्तगत करण्यात काही अडचणी असल्यास, दुय्यम प्रवेशपत्र जिल्हा परिषदेमध्ये त्या विभागामार्फत परीक्षेच्या एक दिवस अगोदर प्राप्त करता येईल.

## 5. इतर महत्वाची माहिती. :-

- Online Form भरण्याची शेवटची वेळ दि 05.04.2015 (रविवार) रात्री 11.00 वाजेपर्यंत राहील व बॅकेत चालान भरण्याची शेवटची तारीख 07.04.2015 (मंगळवार) राहील. या दिवशी बॅकेने रक्कमा भरण्यासाठी विहित केलेल्या वेळेत भरावी लागेल.
- दिनांक 21/04/2015 रोजी सायंकाळी 6.00 वाजता प्राथमिक उत्तरतालीका http://nanded.applygov.com व www.nanded.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
- सदर परीक्षेच्या प्रश्नासंबंधी आक्षेप असल्यास दि. 23/04/2015 रोजी दुपारी 3.00 पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावेत. त्यानंतर दि. 25/04/2015 रोजी उत्तरतालीका अंतीम करण्यात येईल व त्याच दिवशी संध्याकाळी 6.00 वाजता http://nanded.applygov.com व www.nanded.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
- त्यानंतर मुलाखतीस उपस्थीत राहण्याकरीता पात्र उमेदवारांची यादी दि. 29/04/2015 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर, http://nanded.applygov.com व www.nanded.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीकरीता स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.
- पात्र उमेदवारांच्या मुलाखती दिनांक 02/05/2015 सकाळी 11.00 वाजता पासून जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे घेण्यात येतील

- सर्व उमेदवारांच्या मुलाखती पुर्ण झाल्यानंतर कागदपत्र पडताळणीस पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी व कागदपत्र पडताळणीचा दिनांक व स्थळ जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर, http://nanded.applygov.com व www.nanded.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीस अनुपस्थित राहणा-या उमेदवाराचा निवडीसाठी विचार करण्यात येणार नाही.
- वरील दिलेल्या विहीत वेळेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यात येईल.
- अर्ज फक्त Online पद्धतीनेच स्विकारल्या जातील. कार्यालयात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
- जे उमेदवार online अर्ज भरुन challan ची print घेतील परंतु बँकेत ती रक्कम भरणार नाहीत अशा अर्जदारांना शेवटच्या दिनांका अगोदर मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे कळविले जाईल. शेवटच्या दिनांकानंतर किंवा परीक्षा शुल्क न भरलेले उमेदवार अपात्र ठरतील. विहीत वेळेत बँकेत शुल्क भरलेल्या अर्जदारांना ती रक्कम भरल्यानंतर 2 कार्यालयीन दिवसानंतर आपली पात्रता तपासता येईल व जे उमेदवार उक्त बाबींमुळे अपात्र ठरतील त्यांची माहिती संकेत स्थळावर माझी पात्रता तपासा या Link वर Click करु न पाहता येईल. मात्र अपात्र उमेदवारास दि. 08/04/2015 पासून अपात्रता पाहता येईल.
- लेखी परीक्षेसाठी स्थळ, वेळ, प्रवेशपत्रावर देण्यात येईल. उमेदवाराचे प्रवेशपत्र त्यांनी online पद्धतीने दि. 11/04/2015 रोजीपासून Download करुन घ्यावयाचे आहेत. **या कार्यालयाकडून प्रवेशपत्र निर्गमित केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.** उमेदवारांना सदर प्रवेशपत्र हस्तगत करण्यात काही अडचणी असल्यास, दुय्यम प्रवेशपत्र दिनांक 18.04.2015 ते दिनांक 19.04.2015 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत तालुका कार्यालयातून निर्गमित केले जातील.
- कोतवाल पदाच्या परीक्षा दिंनाक 19.04.2015 रोंजी दुपारी 3.00 ते 4.30 या कालावाधीत प्रवेशपत्रावर नमुद जिल्हा मुख्यालयातील परीक्षा केंद्रावर घेण्यात येतील.
- उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे त्यास प्रवेशपत्र देऊन परीक्षेस पात्र करण्यात येईल. उमेदवाराची निवड अंतीम गुणवत्ता यादीत झाल्यास online अर्जाप्रमाणे त्याची सर्व मुळ प्रमाणपत्रे / अभिलेखे यांची सत्यता पडताळणी करण्यात येईल. सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने online भरलेल्या अर्जात नमूद केलेल्या माहितीव्यतिरिक्त सादर केलेल्या इतर कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. **तसेच पडताळणी करताना उमेदवाराने online भरलेल्या अर्जात नमूद केलेल्या बाबीचे प्रमाणपत्र / अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला भरती प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल .**
- यापुढील सर्व माहिती जसे, पात्र / अपात्र उमेदवारांच्या याद्या विद्यार्थ्यांचे online प्रवेशपत्र, उमेदवारांची प्राप्त गुण यादी, अंतिम निवड यादी http://nanded.applygov.com संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
- काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास निवड स्थगित अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.
- उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.
- अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.

- पद भरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनाप्रमाणे आरक्षणाबाबत व इतर सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्या अटी जशास तशा लागू राहतील.
- सदर प्रक्रीयेबाबत काही तक्रार असल्यास या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक 02462 - 235077 या क्रमांकावर सकाळी 10.00 ते 5.45 या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तथापी अर्ज भरताना अडचण उद्‌भवल्यास, हॉल तिकीट उपलब्धतेसाठी इ. तत्सम बाबीसाठी 8888 995 910, 8600 644 166, 880 577 1114 या दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 पर्यंत संपर्क साधावा अथवा support@applygov.com या ई-मेल संपर्कावर अडचणींचे स्वरुप कळविण्यात यावे.
- सदर कोतवाल भरती ही संबंधीत उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत निवड समीतीमार्फत करण्यात येईल.

**दिनांक : .03.2015**
**स्थळ : नांदेड**

**जिल्हाधिकारी नांदेड**